# मिरा भाईंदर महानगरपालिका
## जाहिरात विभाग

मुख्य कार्यालय - छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.), दुरध्वनी क्र.२८१८११८२,८१९२८२८
जाहिरात कार्यालय - शुभम आर्केड, पहिला माळा, डी-मार्ट परिसर, मिरा हॉस्पिटलच्या पुढे, भाईंदर (प.) ४०१ १०१
E-mail--advertise @mbmc.gov.in

दि:-22/०५ /२०२५

जा.क्र./मनपा/जाहिरात/ 80 /२०२५-२०२६

प्रति,
सिस्टीम मॅनेजर
संगणक विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका.

विषय:- **जाहिर प्रकटन प्रसिध्द करणेबाबत.**

मिरा भाईदर महानगरपालिका क्षेत्रात जाहिरात ठेका होर्डिंग व खाजगी होर्डिंगधारक यांना ठेका होर्डिंग/ खाजगी होर्डिंगबाबत जाहिर प्रकटन प्रसिध्द करणेस मा. आयुक्त सो. यांनी मान्यता दिलेली आहे. तरी सदर जाहिरात प्रकटनास महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यांत यावे.

**सोबत :- जाहिर प्रकटन प्रत.**

(स्वप्निल सावंत )
सहा.आयुक्त (जाहिरात)
मिरा-भाईंदर महानगरपालिका

E 1925683

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## जाहिरात विभाग

मुख्य कार्यालय - छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.), दुरध्वनी क्र.२८१८११८२,८१९२८२८
जाहिरात कार्यालय - शुभम आर्केड, पहिला माळा, डी-मार्ट परिसर, मिरा हॉस्पिटलच्या पुढे, भाईंदर (प.) ४०१ १०१
E-mail--advertise @mbmc.gov.in

जा.क्र./मनपा/जाहिरात/ ५८ /२०२५-२०२६ दि:-22/०५ /२०२५

## // जाहीर प्रकटन //

ज्याअर्थी मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात जाहिरात ठेका होर्डीग व खाजगी होर्डीगधारक यांना स्थायी होर्डीग स्ट्रक्चर उभारुन जाहिरात करण्यास परवानगी देण्यात येत आहे.

ज्याअर्थी महाराष्ट्र महानगरपालिका (आकाशचिन्हे (स्काय-साईन) व जाहिरात प्रदर्शित करण्याचे नियमन आणि नियंत्रण) नियम, २०२२ मधील नियम (८) व २३ अन्वये फलकाची संरचानत्मक मजबुती तपासणी करीता लायसन्स प्राप्त संरचना अभियंत्याचे संरचना मजबुतीचे (स्थिरतेचे) प्रमाणपत्र सादर करणेची तरतुद आहे.

ज्याअर्थी नियम ३३ अन्वये जाहिरात लावतांना वाहतूकीस तसेच पादचा-यास त्रास होणार नाही. तसेच जाहिरातीच्या संरचनेमुळे कोणतीही दुर्घटना होणार नाही. याबाबत संबंधित अभिकरणाने (एजन्सी) दक्षता घेणे बंधनकारक राहील. जाहिरातीच्या संरचनेमुळे झालेल्या कोणत्याही अपघातामुळे झालेल्या जिवित / मालमत्तेच्या नुकसानीस संबंधित अभिकरण जबाबदार राहील. असे नमुद आहे.

ज्याअर्थी मागीलवर्षी दि.१३/०५/२०२४ रोजी मुंबई घाटकोपर येथे सोसाटयाचा वारा व वादळामुळे होर्डीग कोसळुन अपघात होऊन जिवित हानी झालेली आहे. सद्यस्थितीत कधीही वारा व वादळी पाऊस येण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच माहे जून २०२५ पासून पावसाळा सुरु होणार असल्याने पावसाळयात वादळी वाऱ्यामुळे पावसामुळे/विजेमुळे होर्डीग/फलक पडुन मुंबई, पुणे व पिंपरी मधील अपघातांची पुनरावृत्ती होऊन अपघात होऊ शकते.

त्याअर्थी त्याअनुषंगाने संबंधित अभिकरणांना (एजन्सी) दि.०७/०५/२०२५ रोजी होर्डीगची डागडुजी व दुरुस्ती करणे बाबत तसेच उभारण्यात आलेल्या होर्डीगचे स्ट्रक्चर शासन अथवा महानगरपालिका संरचना अभियंत्या मार्फत तपासणी करुन होर्डीग सुस्थितीत असले बाबत संरचना मजबुती प्रमाणपत्र (स्ट्रक्चर स्टॅबिलिटी) सादर करणे बाबत पत्रान्वये कळविण्यांत आले आहे.

तरी सदरच्या जाहिरात प्रकटनांद्वारे, संबंधीत अभिकरण (एजन्सी) यांचे होर्डीगमुळे भविष्यात कोणतीही दुर्घटना किंवा अपघात होऊन जिवीत अथवा वित्तहानी झाल्यास त्यास संबंधित अभिकरण (एजन्सी) यांना सर्वस्वी जबाबदार धरणेत येईल व संबंधीत अभिकरण (एजन्सी) यांचेवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करुन संबंधित अभिकरण (एजन्सी) कारवाईस पात्र राहतील. याप्रमाणे सुचना निर्गमित करण्यांत येत आहे.

(कल्पिता पिंपळे)
उप आयुक्त (जाहिरात)
मिरा-भाईंदर महानगरपालिका